# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/11/2023 (गुरूवार) दुपार


### चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील काटोल बसस्टॉप येथे दिनांक ०१/११/२०२३ चे ११.२० वा. ते ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. प्रिती विदेश्वर गजबे, वय ३३ वर्ष रा. ही कळमेश्वर येथुन काटोल करिता बसने येत असता बस मध्ये खुप गर्दी होती जेव्हा फिर्यादी ही काटोल बस स्टॉप येथे खाली उतरत असताना कोणीतरी अज्ञात ईसमाने गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीच्या हॅन्डबॅग मध्ये ठेवलेले इंडियन बॅकेचे व एस. बी. आय बॅकेचे एटीएम, पॅन कार्ड, आधार कार्ड १० वी १२ वी ची मार्कशिट, सन २०१९ मध्ये घेतलेले १ सोन्याचे लॉकेट किंमती ४०००/– रूपये व नगदी १५००/–रू असा एकुण ५,५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दलाल पो.स्टे. काटोल मो. क्र. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

### दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा डोरली आय. एम. टी. कॉलेज येथे दिनांक ०१/११/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वाजता दरम्यान फिर्यादी नामे–विपीन विजयराव बागडे, वय २२ वर्ष, रा. चारगाव ता. काटोल याने आपले चायटपरीचे दुकान चालु केले फिर्यादीचा भाऊ वैभव बागडे हा सुद्धा दुकानावर हजर असतांना सायंकाळी ०५/३० वा. दरम्यान मंगेश वाहने व त्याचे दोन मित्र आले व मंगेश वाहने, रा. कोहळी याने त्याच्या मित्राला म्हटले कि इसको मार यावरून त्याने फिर्यादीची कॉलर पकडुन फिर्यादीला मारपिट केली व फिर्यादीच्या दुकानातील सामानाची फेकफाक केली व त्याने भाजी कापाचे चाकुने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर चिरा मारला ज्यामुळे फिर्यादीला रक्त लागले मंगेश व त्याचे दोन्ही मित्र याने शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपींविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. दयाराम करपाते मो. नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**